संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# मोदी यांचा असा ही मुत्सद्दीपणा

नव्या पंतप्रधानांच्या शपथविधीला परदेशी पाहुण्यांना किंवा अन्य देशाच्या अध्यक्षांना बोलविण्याचा प्रकार पहिल्यांदाच घडतो आहे. आतापर्यंत प्रसिध्द झालेल्या बातम्यांप्रमाणे या शपथविधीला पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनाही आमंत्रित केले गेले आहे. त्याशिवाय दक्षिण आशियाई देशाच्या प्रमुखांनाही आमंत्रणे पाठविली गेली आहेत. हा प्रकार नरेंद्र मोदी यांनी कशासाठी केला अशी चर्चा सुरू होणे स्वाभाविक ठरते. कारण आतापर्यंत अशी आमंत्रणे पाठविली गेली नव्हती. एखादा विशेष कार्यक्रम असेल त्यावेळी अन्य देशाच्या प्रमुखांना बोलविण्याची पध्दत आहे. मग मोदींना या गोष्टींची गरज का भासली. विशेषत: दक्षिण आशियाई म्हणजे सार्क देशाच्या प्रमुखांनाच आमंत्रणे देण्याचा हेतू काय असाही प्रश्न निर्माण होतो. नरेंद्र मोदी स्वत:चे महत्त्व वाढविण्यासाठी ही चाल खेळत असल्याचे बोलले जाते.

शपथविधीलाच परदेशी पाहुण्यांची गर्दी करुन त्यांना नेमके कोणते उद्दिष्ट साधायचे आहे. याचा उलगडा होत नाही. भारताचे सार्क देशांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. जगातल्या अन्य मोठया देशांशी स्पर्धा करणे भारताला किंवा सार्क देशांना शक्य होत नाही. अमेरिका रशिया फ्रान्स जपान इंग्लड यासारख्या विकसित देशांबरोबर सार्क देशांना स्पर्धाही करता येत नाही अशावेळी या आशियाई देशांशी तरी आपले संबंध चांगले असावेत किंवा त्यात भारताला महत्त्वाची भूमिका बजावता येईल, असा उद्देश ठेवून कदाचित मोदी यांनी या देशांच्या प्रमुखांना आमंत्रित केलेले दिसते. त्यांची व्यूहरचना परराष्ट्रीय राजकारणांचा भाग मानावा लागेल.

कारण त्यांनी संसदीय सभागृहात नेतेपदी निवड झाल्यानंतर जे भाषण केले तेव्हा भारतात झालेल्या सत्तांतरामुळे केवळ देशातील जनतेच्याच नव्हे तर जगातील अन्य देशाच्याही मनामध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. या सत्तातरांमुळे भारताबरोबरचे संबंध अधिक चांगले करता येतील का किंवा नवे येणारे सरकार आपल्याबरोबर कसे वागेल याचीदेखील त्यांच्या मनामध्ये उत्सुकता निर्माण झालेली आहे. म्हणूनच देशातील जनतेच्या हिताचा विचार करीत असतानाच जगात भारताचे स्थान तितकेच महत्त्वपूर्ण राहावे या हेतूने त्यांनी काही देशाच्या प्रमुखांना शपथविधीला बोलविण्याचे आगळेवेगळे धाडस केलेले दिसते. त्यामागचा हेतू चांगला असल्यामुळे मोदींच्या या मोहिमेला देखील तसा सकारात्मक प्रतिसाद मिळू शकतो. आतापर्यंत मोदींनी गुजरात विकासाचा अजेंडा राबविताना शेजारच्या राज्यांशी नव्हे तर थेट तामिळनाडूतल्या जयललितांच्या सरकारशी सुध्दा चांगले संबंध निर्माण केले.

## भारतातला पहिला प्रकार

यातला महत्त्वाचा भाग असा आहे की मोदी यांची प्रतिमा आतापर्यंत कणखर किंवा पोलादी पुरुष म्हणून रंगविली गेली. ते कठोरपणे वागतात. त्यांच्यामध्ये असलेले राष्ट्रीयत्त्वाचे विचार किंवा त्यांच्यामधले हिंदुत्व पाहिल्यानंतर त्यांनी पाकिस्तानच्याही पंतप्रधानानाही आवतण धाडल्यामुळे काँग्रेससकट अनेकांच्या भुवया उंचावल्या. देशातल्या तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी मंडळीच्या पोटात तर गोळाच उठला कारण गोध्रा इथल्या दंगलीनंतर मोदी हे कट्टर मुस्लीमविरोधी आहेत, भारतात दहशतवाद पसरविण्याऱ्या पाकिस्तानशी ते इतक्या लवकर मैत्रीचा हात पुढे करतील असे सामान्य माणसालाही वाटले नव्हते.

परंतु त्यांची ही चाल पाहिल्यानंतर त्यांच्या डोक्यामध्ये काहीतरी वेगळा विचार सुरू आहे हे स्पष्ट होते. गेल्या ५० वर्षामध्ये पाकिस्तानने भारताशी कधीही चांगले संबंध निर्माण केले नाहीत. मोदींचेच नेते असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या कारकिर्दीत लाहोरला बस प्रवास करून चांगले संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण त्याच पाकिस्तानने कारगिलमध्ये घुसखोरी करून भारताशी युध्द केले होते. सतत काहीनाकाही कुरापती करणाऱ्या आणि काश्मिर आपल्या ताब्यात आणण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानला मोदींनी पंतप्रधान होण्यापूर्वीच कशासाठी गोंजारले अशी शंका मनामध्ये सहजपणे येते.

परंतु पाकिस्तानसारख्या सतत वाकडया वाटेने जाणाऱ्या देशाला समजूतदारपणे काही गोष्टी सांगण्याचा मोदी यांचा प्रयत्न दिसतो. विशेष म्हणजे मोदींनी पाकिस्तानबरोबरच श्रीलंका नेपाळ भूतान अशा सार्क देशांच्या प्रमुखांनाही बोलावले आहे. याचा अर्थ पाकिस्तानबरोबर त्यांनी अन्य मित्रही जोडण्याची सुरुवात केली आहे. आता बोलावलेल्या राष्ट्रप्रमुखांपैकी कितीजण शपथविधीला येतात हा भाग वेगळा. मात्र नवाज शरीफ हे जर शपथविधीला आले तर मोदी यांनी पाकिस्तानबरोबरच्या संबंधांना सुरुवातीलाच चांगले वळण लावले असा अर्थ घेतला जाईल कारण शपथ घेणे हा केवळ घटनात्मक किंवा राजकीय भाग न राहता त्याचे इतरही परिणाम साधण्याचा त्यांचा स्पष्ट प्रयत्न दिसून येतो

## आंतरराष्ट्रीय राजकारण बदलते आहे

आज आंतरराष्ट्रीय पातळीवर सुध्दा वेगळया राजकारणाची आवश्यकता आहे. पाकिस्तान असो श्रीलंका नेपाळ असो किंवा अगदी अमेरिका चीन रशिया असो या देशांबरोबर संबंध सुधारण्यासाठी किंवा या प्रत्येकाचा भारताकरीता उपयोग करून घेण्यासाठी वेगळया मुत्सद्दीपणाची गरज आहे सरकारी पध्दतीने किंवा परंपरागत पठडीबाजपणे परराष्ट्र धोरणाचा विचार न करता अधिक वेगाने आणि अधिक कौशल्याने परराष्ट्र संबंधाची आखणी करणे गरजेचे ठरते. आतापर्यंतच्या कोणत्याच सरकारला पाकिस्तानचे वाकडे शेपूट सरळ करता आले नाही. मोदी यांना ते वेगळया मार्गाने सरळ करण्याची इच्छा दिसते म्हणूनच शपथविधीला अन्य देशांच्या प्रमुखांना बोलावून मोदी यांनी मुत्सद्दीपणाची खेळी केली आहे असे म्हणता येईल.